**सुभाषित :**
सुखमापतितं सेव्यं दुःखमापतितं तथा |
चक्रवत्परिवर्तन्ते दुःखानि च सुखानि च ||

**अर्थ :**
ज्याप्रमाणे प्राप्त झालेले सुखं आपण (आनंदाने उप)भोगत असतो, त्याच प्रमाणे दुःखही भोगले (सोसले) पाहिजे. कारण सुखे आणि दुःखे चाकाप्रमाणे फिरत असतात. (जसं नेहमी सुख मिळत नाही, तसं सतत दुःखसुद्‌धा सोसावं लागत नाही. तर तक्रार न करता आनंदाने प्रारब्धाला तोंड दिलं पाहिजे.)